सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
Email ID :- prashant.nikam@nic.in

क्र.:- पुबासे २०२१ प्र.क्र. ५८/२४ दिनांक :- ०१ फेब्रुवारी २०२४

प्रति,
संचालक,
माहीती तंत्रज्ञान संचालनालय,
मंत्रालय, मुंबई

विषय: निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) कार्यासनातील पुस्तक/ अभिलेख/ नोंदवह्या बांधणी व स्पायरल बाईंडींगसाठीचा करार दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी समाप्त झालेला आहे. त्यानुसार, (०१ वर्षासाठी) दिनांक ०१ फेब्रुवारी २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीसाठी सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) कार्यासनातील पुस्तक/ अभिलेख/ नोंदवह्या बांधणी व स्पायरल बाईंडींगसाठी करार इ. कामांसाठी दरकरार करण्यासाठी निविदा सूचना सोबत जोडली आहे. सदर निविदा सूचना शासनाच्या संकेतस्थळावरुन प्रसिध्द करण्यात यावी. ही विनंती.

आपला,

(प्र. शां. निकम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Scanned with OKEN Scanner

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

Email ID :- prashant.nikam@nic.in

---

**क्र.:- पुबासे २०२१ प्र.क्र. ५८/२४**

## निविदा सूचना

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई मधील कार्यासनातील **पुस्तक/ अभिलेख/ नोंदवह्या बांधणी व स्पायरल बाईंडींग इ.** कामे करण्यासाठी **(दिनांक १ फेब्रुवारी २०२४ ते दिनांक ३१ जानेवारी २०२५)** या एक वर्ष कालावधीसाठी दरकरार करण्याकरिता मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

२. **मोहोरबंद लिफाफ्यावर" सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई मधील कार्यासनातील पुस्तक/ अभिलेख/ नोंदवह्या बांधणी व स्पायरल बाईंडींग करण्याबाबत दरकरार निविदा सन २०२४"** असे लिहिणे आवश्यक आहे, निविदेच्या अटी व शर्ती विचारात घेऊन इच्छुक निविदाधारकानी तांत्रिक लिफाफ्यातील विवरणपत्रात नमुद केलेल्या अभिलेखांचा दर नमूद करुन तांत्रिक लिफाफा व अतांत्रिक लिफाफा असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे मध्ये **कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग ( कार्यासन क्र. २४) मंत्रालय, विस्तार इमारत, ६ वा मजला, रुम नं.६१२, मुंबई येथे दि.०१.०२.२०२४ ते दि. १०.०२.२०२४ पर्यंत ४.०० वाजेपर्यंत** जमा करावेत. त्यानंतर आलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत. दोन लिफाफा पध्दतीने निविदा सादर न केल्यास निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३. निविदा फॉर्मवर निविदा धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. प्राप्त निविदा उघडण्याची तारीख, वेळ आपण नमूद केलेल्या E mall पत्त्यावर किंवा मोबाईल क्रमांकावर कळविण्यात येईल. त्यासाठी लिफाफ्यावर e-mail तसेच भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा, याबाबतची जबाबदारी निविदाकाराची राहील. निविदा मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल. (मंत्रालय प्रवेश नियमानुसार)

**निविदेबाबतच्या अटी व शर्तीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-**

१. शासकीय कार्यालयात पुस्तक बांधणी काम केल्याचा ०३ वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र जोडणे.

२. कंपनी नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३. आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅन) व जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

४. देयक सादर करताना देयके प्रमाणित करुन स्वाक्षरी बील देयके (का.२४) ला सादर करावीत. देयकांची रक्कम पुरठादारास अदा करण्यासाठी पुरवठादारांने अवर सचिव (कार्यासन-२६), सामान्य प्रशासन विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे बँकेच्या खात्याचा तपशील सादर करणे आवश्यक राहील. सर्व परिपूर्ण माहीतीसह देयके सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही

Scanned with OKEN Scanner

५. एका पुरवठेदारास एकच निविदा सादर करता येईल.

६. कोणतेही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा निविदा स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

७. निविदा स्वीकृत होणाऱ्या पुरवठादारास उपरोक्त **मुद्दे क्र.१ ते ६** या बाबींची लेखी हमी रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर दयावी लागेल.

**उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत पुरवठादाराने ज्यावर GST क्रमांक व कार्यालयाचा पत्त नमूद असलेल्या लेटरहेडवर स्वाक्षरी व रबरी शिक्का मारुन पत्र सोबत जोडावे.**

(प्र. शां. निकम)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

दिनांक:- ०१ फेब्रुवारी २०२४
ठिकाण:- **मुंबई**

Scanned with OKEN Scanner

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

Email ID :- prashant.nikam@nic.in

---

**पुस्तक/ अभिलेख/ नोंदवह्या बांधणी व स्पायरल बाईंडींग निविदा सन २०२४**

**लिफाफा-१: तांत्रिक दरपत्रक (फॉर्म-अ)**

निविदेच्या अटी व शर्ती विचारात घेऊन इच्छुक निविदाधारकांनी खालील विवरणपत्रात नमुद केलेल्या अभिलेखांचा दर नमूद करावा.

| अ.क्र. | पुस्तक/अभिलेख बांधणी तपशिल | बुक बाईंडर दर रुपयात |
|---|---|---|
| १ | वेतन देयक पुस्तक लेदर व रेगझिन बांधणी | |
| २ | धनादेश नोंदवहया पुस्तक बांधणी | |
| ३ | शासकीय पावती पुस्तके बांधणी | |
| ४ | टोकन रजिस्टर पुस्तक बांधणी | |
| ५ | अनुसूची पुस्तक बांधणी | |
| ६ | अप्रोप्रिएशन रजिस्टर पुस्तक बांधणी | |
| ७ | सेवा पुस्तक बांधणी | |
| ८ | संदर्भ नोंदवहया पुस्तक बांधणी | |
| ९ | लॉग बुक पुस्तक बांधणी | |
| १० | स्पायरल बाईंडिंग १०० पानी | |
| ११ | वेतन रजिस्ट्ररवर चार लाईन सोनेरी नाव | |

**अ. निविदेचा कालावधी:- ०१ फेब्रुवारी २०२४ ते दि. १० फेब्रुवारी २०२४**
**ब. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक:- दि. १० फेब्रुवारी २०२४, दुपारी ४.०० पर्यंत**
**क. निविदा उघडण्याचा दिनांक:- दि. १० फेब्रुवारी २०२४, दुपारी ४.३०**

ठिकाण :-
दिनांक :-

**निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**

(सुचना :- दरामध्ये तसेच निविदा कागदपत्र कोठेही खाडाखोड, ओव्हररायटिंग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.)

Scanned with OKEN Scanner

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
Email ID :- prashant.nikam@nic.in

### पुस्तक/ अभिलेख/ नोंदवह्या बांधणी व स्पायरल बाईंडींग निविदा सन २०२४
### लिफाफा-२ :-अतांत्रिक वित्तीय दरपत्रक (फॉर्म ब)

१. निविदाधारकाचे नांव व कार्यालयाचा पूर्ण पत्ता :-

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :-

३. दूरध्वनी क्रमांक अ) कार्यालय :-
ब) मोबाईल :-

४. e-mail Address:-

**सूचना:** दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

दिनांक-
ठिकाण - मुंबई

**निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**

Scanned with OKEN Scanner